12:26:32 PM

नि. दि. दावा क्र.३५/२०१७

धिरजकुमार पिरथानी वि. शिवाजी आघाडे

**निशाणी क्र. ९१**

**वादीतर्फे साक्षीदार क्र. ३**

| | | |
|---|---|---|
| **साक्षीदाराचे नांव** | :- | **कचरूलाल प्रेमप्रकाश सेठी** |
| **वय** | :- | **५३** |
| **धंदा** | :- | **स्टॅम्प वेंडर** |
| **रा.** | :- | **बाजारपेठ, कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद.** |

**सरतपास विधिज्ञ श्री.एम.एम.भारूका यांच्यामार्फत**

१. मी गेल्या २० वर्षापासून दस्तूर लिहिण्याचे काम करतो. माझे वडील दस्त लेखक म्हणून काम करायचे. त्यांचे नांव प्रेमप्रकाश दगडूलाल सेठी असे होते. ते सज्ञान झाल्यापासून मरेपर्यंत दस्त लिहिण्याचे काम करायचे. मी त्यांचे अक्षर ओळखू शकतो. आता मला निशाणी ७४ वरील मृत्यूपत्र दाखवण्यात आले. सदर मृत्यूपत्र माझ्या वडलांच्या हस्ताक्षरात लिहिलेले आहे. त्याच्यावर दस्तूर लिहिणार म्हणून प्रेमप्रकाश सेठी यांचे नांव आहे.

**उलटतपास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. एम.व्ही. निंभोरकर यांच्यामार्फत**

२. माझी जन्म तारीख ०२.०९.१९७१ आहे. मी खरेदी-विक्रीचे व्यवहार करतो. मी गेल्या २०-२५ वर्षात मी अंदाजे १०० मृत्यूपत्र लिहिले आहे.

प्रश्नः- मृत्यूपत्राला नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसाय करणा-या डॉक्टरांचे प्रमाणपत्र असणे अनिवार्य असते?

उत्तरः- पूर्वी नव्हते आता आहे.

मृत्यूपत्र करणारा व्यक्ती तब्येतीने चांगला आहे किंवा कसे या करीता वैद्यकीय प्रमाणपत्र अनिवार्य असते. मी निशाणी ७४ पाहिले. हे खरे नाही की, माझ्या

सरतपासातील मजकुर खोटा आहे.

उलटतपास पूर्ण.

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2025.10.16 12:26:15 +0530

कन्नड. (वि. द. पाटील)

दिनांक : १६/१०/२०२५ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

12:37:21 PM कन्नड.